बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि १२ जानेवारी २०२४**

# फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १४/२०२४ भादवि ४९८(अ),३२३,५०४,५०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | सन २००८ ते दि ११/०४/२०२४ रोजी फिर्यादीचे सासरी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०१/२०२४ रोजी ०२.४९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | अपर्णा रमण साबळे,वय-३६ वर्षे,रा-१६,कोनापुरे चाळ फॉरेस्ट बुध्द विहार शेजारी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | रमण सातप्पा साबळे,रा- १५१ लक्ष्मी पेठ सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,सन २००८ ते ११/०४/२०२४ च्या दरम्यान यातील फिर्यादी ही सासरी नांदत असताना यातील नमुद आरोपी मजकूर याने किरकोळ वादविवाद करून सतत शिवीगाळ व मारहाण करीत व मुलगी झाली म्हणून मारहाण करीत तसेच तु मला पसंद नाही केवळ हुंडा मिळावा म्हणून तुझ्याशी लग्न केलेले आहे तु मला कार घेण्यासाठी माहेरून पाच लाख रूपये घेवून ये नाहीतर तु मला बोलायचे नाही काही एक विचारयाचे नाही असे म्हणून दमदाटी करीत असत सदर अरोपीकडून होणारा त्रास हा फिर्यादीने सर्व ठीक होईल या आशेपोटी सहन केले आहे तसेच आरोपी हा फिर्यादीस डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त मुंबईला चाललो आहे असे सांगून निघून गेले ते परत आले नाही तशी पोलीस ठाणेत बेपत्ता नोंद फिर्यादीचे सासूने केली असून आरोपीने फिर्यादीचे नातेवाईक यांना व्हॉटसअॅपवर मला आई,भाऊ,बहिण,पत्नी,व मुलगी यांचे सोबत मला रहायचे नाही मी माझी सोय केली आहे माझे दुसऱ्या मुलीवर प्रेम आहे मी तिचे सोबत राहणार आहे मी सोलापूरला येणार नाही असे मेसेज पाठविले आहे तरी सदर आरोपी हा त्याचे स्वत:चे अस्तित्व लपवून फिरत आहे त्याचे असे वागण्यामुळे फिर्यादीस शारीरीक व मानसिक त्रास होत आहे.म्हणून.तपास- सपोनि बनसवडे- **७८४३०९३७०६** |

# जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ०८/२०२४ भादवि ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ११/०१/२०२४ रोजी ११.०० वा ते १८.०० वा चे दरम्यान सेव्हन हिल्स टेलर दुकान समोर अशोक सराफ बाजार सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०१/२०२४ रोजी २२.१६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | म.गौस अब्दुल रजाक शेख,वय-२६ वर्षे रा- न्यु विडी घरकुल एस.पी.गॅस ब ग्रुप २५९/१ कुंभारी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | २५,०००/- रू ची काळया रंगाची त्यावर लाल पट्टा असलेली हिरो एच.एफ.डिलक्स मो.सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांच्या ताब्यातील मो.सायकल क्र एमएच १३ सी वाय ४९१६ ही वरील ठिकाणी पार्क करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे समंतीवाचून फिर्यादीची वरील वर्णनाची व किंमतीची मो.सायकल ही मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून.तपास- सफौ सातपुते- |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २६/२०२४ भादवि ३२४,३२३,५०४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १०/०१/२०२४ रोजी २३.३० वा ते २३.४५ वा. चे दरम्यान कुमठा नाका सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०१/२०२४ रोजी २३.१० वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | निखील नामदेव वाघमोडे,वय-२१ वर्षे,रा- कुमठा नाक तक्षशिला नगर सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | शुभम तुळसे,रा- संजय नगर कुमठा नाका सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,दि १०/०१/२०२४ रोजी २३.३० ते २३.४५ वा चे दरम्यान कुमठा नाका येथे रोडवर धक्का लागल्याचे कारणावरून तु माझ्याकडे रागाने का पाहिला असे म्हणून आरोपी मजकूर यांने शिवीगाळ करून हातात लोखंडी सळई घेवून फिर्यादीचे डोकीस मागील बाजूस कानास मागील बाजूस उजवे हाताचे कोपऱ्यावर डावे हाताचे दंडावर पाठीस मारून गंभीर जखमी केले आहे.म्हणून.तपास- पोह/९२४/नदाफ-९७३०४८११९६ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १२/२०२४ भादवि ३२४,३२३,५०४,५०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २५/१२/२०२३ रोजी २१.२० वा चे सुमारास नडगीरी पेट्रोल पंपच्या बाजूला ए बी पान शॉप जवळ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ११/०१/२०२४ रोजी २३.२९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | समर्थ मेघराज थोबडे,वय-३० वर्षे,रा- १४.रोहिणी नगर भाग १ ओमगर्जना चौक सैफुल सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | बसु जवळकोठे,रा-पाटील नगर सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि २५/१२/२०२३ रोजी २१.२० च्या सुमारास यातील फिर्यादी नमुद ठिकाणी त्याचे मित्र अतिश माशाळकर असे थांबलेले असताना फिर्यादीचे ओळखीचा यातील आरोपी मजकूर हा फिर्यादी जवळ येवून विनाकारण शिवीगाळ करू लागला त्यावेळी फिर्यादी त्यास समजावून सांगत असताना आरोपीने त्याचे मो.सायकलीचे चावीचे किचन म्हणून वापरातील लहान चाकुने फिर्यादीचे उजव्या व डाव्या पोटाला व हाताचे कोपऱ्यावर उजव्या पायाच्या गुडघ्यावर चाकुने वार केला तेव्हा मित्र अतिश हा सोडविण्यासाठी मध्ये आला असता आरोपीचे हातातील चाकू काढून घेत असताना त्याचे उजव्या हाताला चाकु लागुन तो जखमी झाला आहे.म्हणून.तपास-पोह/१०४३/गायकवाड-७०२०४९१५४५ |